सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /शिष्य./२०२१/1838 दिनांकः- 07 JUL 2021

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग. नागपूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडिबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/विकाना/डिबीटी पोर्टल/२०२१/१४२९/ दि. ०४/०६/२०२१
२) मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र. क्र.१८/तंशिसं /डीबीटी /विकाप/२०२१ / २०१०/ दि. ०२/०७/२०२१

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडिबीटी पोर्टलवरील, तंत्रशिक्षण विभागांमार्फत राबविण्यांत येणा-या शिष्यवृत्तीचे अर्ज तपासणी करून या कार्यालयास पाठविण्यांबाबत आपणांस वारंवार कळविण्यांत आलेले आहे. **तरीही संस्थास्तरांवर व विद्यार्थ्यांच्या लॉगीन मध्ये अनुक्रमे २८६ व ७६५ अर्ज प्रलंबित असल्याचे दिसून येते. ही अत्यंत खेदाची बाब आहे.**

पुनःश्च याव्दारे आपणांस सूचित करण्यांत येते की, सोबत जोडलेल्या स्क्रीनशॉट नुसार, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडिबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना अर्ज भरून अंतिम मंजूरीस्तव वरीष्ठ कार्यालयास पाठविण्यांकरिता तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२० करितादेखील, विद्यार्थ्यांकडून पुनःश्च अर्ज (Re-Apply) भरून घेण्यासाठी व तपासणीसाठी दि. १५/०७/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. परंतु अंतिम मुदती पर्यंत आपल्या लॉगीन मध्ये अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेंच्या शासन निर्णयांतील अटी व शर्तीनुसार तपासणी करून (मंजूर/ नामंजूर) वेळेमुदतीच्या आत निकाली काढावेत. **जर विद्यार्थी संबंधित शिष्यवृत्तीस पात्र नसेल तर अर्ज विद्यार्थ्यांना Send Back न करता संस्थारस्तरारून नामंजूर (Reject) करावे. तसेच विद्यार्थ्यांच्या लॉगीन मध्ये प्रलंबित असलेल्या अर्जाबाबत संस्थेने, विद्यार्थ्यांना अर्जातील त्रुटीची पुर्तता करून आपणांस सदर अर्ज सादर करण्यांबाबतच्या सुचना देवून विद्यार्थ्यांच्या लॉगीन मध्ये प्रलंबित असलेले अर्ज तात्काळ निकाली काढावेत.**

**जर पात्र विद्यार्थी अर्ज भरण्यापासून किंवा संस्थांस्तरावर प्रलंबित कारणाने, वंचित राहिल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.**

(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर